सकाळ

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर



## नऊ राज्यांतील १३ विद्यापीठांतील विद्यार्थी होणार सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : राष्ट्रीय सेवा योजना विभागीय संचालनालय, पुणे आणि शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (ता. १५) ते शुक्रवार (ता. २१) दरम्यान राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन केले आहे. नऊ राज्यांतील १३ विद्यापीठांचे विद्यार्थी या शिबिरात सहभागी होणार आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‌घाटन होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

देशातील विद्यार्थ्यांनी एकाच ठिकाणी राहून आपल्या संस्कृतीची देवाण-घेवाण करून राष्ट्रीय एकात्मता वाढवावी हा या शिबिराचा उद्देश असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून ते भाषा भवनपर्यंत सांस्कृतिक रॅलीने शिबिराची सुरुवात होणार आहे. शिबिराच्या सात दिवसांच्या काळात विद्यापीठ

पान ४ वर »

सकाळ

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

» पान १ वरून

स्पेस सेंटर, पन्हाळा तसेच न्यू पॅलेसला येथे स्थळ भेट होणार आहे. याशिवाय विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन असे कार्यक्रम होणार आहेत. विविध स्पर्धांतील विजेत्यांना मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. गुरुवारी (ता. २०) 'आनंदोत्सव' हा सांकृतिक कार्यक्रम होणार असल्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नाधवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, अजय शिंदे आदी उपस्थित होते.

**संशोधनासाठी सक्षमीकरण योजना :**

विद्यापीठातील विविध विभागांत अध्ययन करणाऱ्या शिक्षकांना संशोधनासाठी चालना देण्यासाठी संशोधन सक्षमीकरण योजना आणली आहे. या अंतर्गत नवीन संशोधन प्रकल्प बंद आहेत किंवा लवकरच संपणार आहेत, अशांना या योजनेद्वारे मदत दिली जाणार आहे. विद्यापीठाची समिती संशोधन प्रकल्पाचे मूल्यमापन करेल. त्यानंतर लाखांपर्यंतचा निधी दिला जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

Kolhapur, Kolhapur-Today
15/12/2018 Page No. 4

पुढारी

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये शनिवारपासून (दि. १५) राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठासह इतर विद्यापीठे तसेच १३ विद्यापीठांचे संघ सहभागी असणार आहेत.

शिबिराचे उद्घाटन शनिवारी (दि. १५) सायंकाळी पाच वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या उपस्थितीत २१ डिसेंबरला समारोप होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पाँडिचरी, केरळ, राजस्थान, गोवा आदी राज्यांतील विद्यापीठांचे संघ या शिबिरात सहभागी असणार आहेत. राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वृद्धीकरिता विशेष उपक्रम असणार आहेत. या शिबिरामध्ये एकात्मता फेरी, विविध राज्यांचे वैशिष्ट्य असणारे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे एकात्मभाव वृद्धीचे सादरीकरण, तसेच तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्याने असणार आहेत.

यासह शिबिरार्थींकरिता वादविवाद, लघुनाटिका, देशभक्तीपर गीत, रांगोळी, छायाचित्रण व विविध कलाकृतींच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळच्या सत्रामध्ये सर्व सहभागी शिबिरार्थींना शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळा किल्ल्यानजीक असणारे स्पेस सेंटर व दुपारच्या सत्रामध्ये न्यू पॅलेस म्युझियम येथे भेटीचे आयोजन केले आहे.

शिबिराचे आयोजन भारत सरकारच्या राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेळ मंत्रालय व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केले आहे. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2018
तरुण भारत

# राष्ट्रीय एकात्मता शिबिर आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय एकात्मतावाढीसाठी १५ ते २१ डिसेंबर दरम्यान शिवाजी विद्यापीठामध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. शिबिरामध्ये महाराष्ट्रसह विविध राज्यांतील विद्यापीठाचे संघ याप्रमाणे २१० शिबिरार्थी, संघव्यवस्थापक सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू शिंदे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना, युवा आणि खेल मंत्रालय, व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले आहे.

**शिवाजी विद्यापीठात आयोजन**

आज या शिबिराचे उद्घाटन सायंकाळी ५ वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे होणार आहे. यानंतर विविध कलाकृतींच्या स्पर्धा होणार आहेत. दुसऱ्या दिवशी शिबिरार्थींना पन्हाळ्यावरील शिवाजी विद्यापीठाचे स्पेस सेंटर व न्यू पॅलेस म्युझिअमला भेट देण्याचे नियोजन आहे. शुक्रवार (२१) शिबिराचा समारोप आहे.

15 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : देशातील १३ विद्यापीठांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात दि. १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिबिरात ९ राज्यांतील १३ विद्यापीठांचे संघांचा समावेश आहे. यामध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुच्चेरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा आदी राज्यांतील विद्यापीठांचे संघ याप्रमाणे २१० शिबिरार्थी, संघव्यवस्थापक सहभाग असेल.

दि. १५ रोजी जिल्हा पोलीसप्रमुख अभिनव देशमुख यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे, तर शिबिराचा समारोप निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ रोजी होणार आहे. दि. १५ पासून एकात्मता फेरी, विविध राज्यांची संस्कृती संवर्धनास अनुसरून सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे एकात्मभाव वृद्धी, तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्याने व मार्गदर्शन तसेच शिबिरार्थींकरिता वादविवाद, लघुनाटिका, देशभक्तिपर गीत, रांगोळी, छायाचित्रण व विविध कलाकृतींच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

दि. १६ रोजी सकाळच्या सत्रामध्ये सर्व सहभागी शिबिरार्थींना शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळा किल्ल्यानजीकच्या क्षेत्रात असणारे स्पेस सेंटर व दुपारच्या सत्रामध्ये न्यू पॅलेस म्युझियम येथे क्षेत्रीय भेटींचे आयोजन करण्यात आलेले आहे.

पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे आणि डॉ. डी. के. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

### नवनाथ गोरे यांना विशेष शिष्यवृत्ती

आपल्या पहिल्या 'फेसाटी' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणाऱ्या नवनाथ गोरे यांना शिवाजी विद्यापीठातर्फे विशेष शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. ते म्हणाले, या शिष्यवृत्तीनुसार त्यांना पुढील तीन वर्षांसाठी प्रतिमाह १० हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. अशा प्रकारच्या शिष्यवृत्तीमुळे गोरे यांना आर्थिक आधार तर मिळणार आहेच, त्याच बरोबर त्यांच्याकडून पुढील काळात अधिक सकस नवनिर्मिती होईल.

### संशोधन सक्षमीकरण योजनेस मंजुरी

शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी 'संशोधन सक्षमीकरण योजना' सुरू करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत शिक्षकांना संशोधनासाठी विद्यापीठ निधीतून ३ लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाणार आहे. गठित समितीकडून प्रकल्पाचे मूल्यमापन केल्यानंतर विद्यापीठाच्या निधीतून हे पैसे देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर खेळाडूंना सराव शिबिरादरम्यानच्या भत्त्यामध्ये वाढ करण्यात आली असून, तो २५० रुपये करण्यात आला आहे, तर स्पर्धेदरम्यानचा भत्ता ३५० रुपये करण्यात आला आहे. सराव शिबिराच्या आयोजनाच्या निधीतही दुप्पट वाढ करण्यात आली आहे.

सकाळ

# नवनाथ गोरे यांना विद्यापीठाची शिष्यवृत्ती

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

सकाळ वृत्तसेवा



नवनाथ गोरे

कोल्हापूर, ता. १४ : 'फेसाटी'कार नवनाथ गोरे यांना शिवाजी विद्यापीठाने आज प्रोत्साहनपर विशेष शिष्यवृत्ती जाहीर केली. तीन वर्षांसाठी दरमहा १० हजार रुपये दिले जाणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार बैठकीत ही माहिती दिली.

गोरे यांच्या कादंबरीला साहित्य अकादमीचा युवा साहित्यिक पुरस्कार मिळाला. गोरे यांनी



शिवाजी विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण घेत असताना ही कादंबरी लिहिल्याने 'फेसाटी'च्या रूपाने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या लेखनाचा गौरव करण्यासाठी तसेच गोरे यांच्याकडून उत्तम दर्जाची नवनिर्मिती व्हावी, या उद्देशाने पालकत्वाच्या भूमिकेतून शिवाजी विद्यापीठाने नवनाथ गोरे यांना प्रोत्साहनपर विशेष शिष्यवृत्ती जाहीर केल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

गोरे यांना तीन वर्षांसाठी दरमहा १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

### खेळाडूंच्या भत्त्यात वाढ

शिवाजी विद्यापीठाचे अनेक खेळाडू राज्य तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. त्याचे प्रोत्साहन घेऊन आज अनेक विद्यार्थी खेळाचा सराव करत आहेत. अशा सराव करणाऱ्या खेळाडूंच्या भत्त्यात वाढ करून दरदिवशी अडीचशे रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

लोकमत

## देवानंद शिंदे : खेळाडूंच्या सराव शिबिराच्या भत्त्यामध्ये वाढ

# प्राध्यापकांसाठी 'संशोधन सक्षमीकरण'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : संशोधनाला बळ देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने प्राध्यापकांसाठी 'संशोधन सक्षमीकरण योजना' सुरु केली आहे. योजनेअंतर्गत विद्यापीठ परिसरातील (कॅम्पस) प्राध्यापकांना तीन लाखांपर्यंतचा निधी दिला जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ परिसरातील ज्या प्राध्यापकांकडे एकही संशोधन प्रकल्प नाही अथवा ज्यांच्याकडील प्रकल्पाचे काम संपत आले आहे. अशा प्राध्यापकांना संशोधन साहाय्य निधी म्हणून विद्यापीठाच्या निधीतून तीन लाख रुपये दिले जाणार आहेत. विज्ञान, वाणिज्य-व्यवस्थापन, सामाजिकशास्त्रे अशा विविध विद्याशाखांतील प्राध्यापकांसाठी संबंधित योजना आहे. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खेळाडूंच्या सराव शिबिरासाठीच्या भत्त्यामध्ये वाढ केली आहे. सरावासाठी विद्यार्थ्याला २५० रुपये, तर स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूला ३५० रुपये इतका भत्ता आता मिळणार आहे. सराव शिबिराच्या आयोजनासाठी १० ते २० हजारापर्यंत वाढ केली आहे.

## विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा प्रारंभ आज, शनिवारपासून शिवाजी विद्यापीठात होणार आहे. त्यात देशभरातील २१० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. २१ डिसेंबरपर्यंत हे शिबिर सुरु राहणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि एनएसएसचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी शुक्रवारी दिली. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'एनएसएस'चा पुणे विभाग आणि केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालयातर्फे आयोजित या शिबिराचे संयोजनाचा मान शिवाजी विद्यापीठाला पहिल्यांदाच मिळाला आहे. या शिबिरात देशातील नऊ राज्ये आणि १३ विद्यापीठांमधील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. शिबिराचे उद्घाटन आज, शनिवारी सायंकाळी पाच वाजता जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख आणि कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

## नवनाथ गोरे यांना विशेष शिष्यवृत्ती

साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक नवनाथ गोरे यांच्या पीएच. डी.च्या संशोधनासाठी विद्यापीठाने आर्थिक साहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत लेखक गोरे यांना दरमहा १० हजार रुपये इतकी विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासह संशोधनासाठी किरकोळ खर्चासाठी वर्षासाठी पाच हजार रुपये देण्यात येणार आहेत.


पुढारी

# विद्यापीठातील प्राध्यापकांच्या संशोधनासाठी प्रोत्साहन निधी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे अधिविभागातील प्राध्यापकांकडून करण्यात येणाऱ्या संशोधनासाठी प्रोत्साहनाच्या हेतूने 'संशोधन सक्षमीकरण योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्राध्यापकांना तीन लाखांपर्यंतचा निधी दिला जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. खेळाडूंना सराव शिबिरासाठी दिल्या जाणाऱ्या निधीत वाढ करण्यात आल्याचे तसेच साहित्य अकादमी पुरस्कार विजेते युवा लेखक नवनाथ गोरे यांना संशोधनासाठी आर्थिक साहाय्य देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



शिवाजी विद्यापीठातून

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील ज्या प्राध्यापकांकडे सध्या एकसुद्धा संशोधन प्रकल्प नाही किंवा ज्यांच्या संशोधन प्रकल्पाचे काम संपत आले आहे. अशा प्राध्यापकांना संशोधन साहाय्य निधी दिला जाईल. यासाठी विद्यापीठ निधीतून तीन लाख रुपये दिले जातील. वाणिज्य-व्यवस्थापन, विज्ञान, सामाजिकशास्त्रे आदी विविध विद्याशाखांतील प्राध्यापकांसाठी संबंधित ही योजना आहे.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विविध क्रीडा स्पर्धामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंच्या सराव शिबिरासाठीच्या सध्या दिल्या जाणाऱ्या भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर सराव शिबिरासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला २५० रुपये, तर स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूला ३५० रुपये इतका भत्ता आता मिळेल. सराव शिबिरांच्या आयोजनासाठी देण्यात येणाऱ्या निधीतही वाढ करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यासह साहित्य अकादमी पुरस्कार विजेते युवा लेखक नवनाथ गोरे यांच्या पीएच.डी.च्या संशोधनासाठी विद्यापीठाने आर्थिक साहाय्य करण्याचा निर्णय घेतला असून, त्यांना मासिक १० हजार रुपयांची विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आले. तसेच आवश्यक पुस्तके, नोटस् अशा खर्चासाठी एका वर्षासाठी पाच हजार रुपये दिले जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

पुढारी

# लोकसहभागातून विद्यार्थिनींसाठी वसतिगृह बांधणार

## विद्यापीठातून..

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात लोकसहभागातून तसेच कंपन्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून विद्यार्थिनींसाठी नवे वसतिगृह बांधले जाणार आहे. याबाबत संबंधितांना आवाहन करण्याच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी उपस्थित होते.

बैठकीत अधिविभागातील प्राध्यापकांना संशोधनासाठी साहाय्य निधी तसेच क्रीडा स्पर्धेचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांना एकत्रित सराव शिबिरासाठीच्या भत्त्यात वाढ करण्याच्या प्रस्तावाच्या निर्णयास मान्यता देण्यात आली. यावेळी सदस्य उपस्थित होते.